माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**
**अपील क्रमांक : ६२१/२०२५**

**अपिलार्थी — श्री. सदानंद एस. गणविर,**
**रा. अंबिका नगर, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता,**
**जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग पुसद, ता. पुसद,जि. यवतमाळ**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.-२, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ३०-०९-२०२४ | निरंक | ०४-१०-२०२४ | निरंक |

अपिलार्थी **श्री. सदानंद एस. गणविर** यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २८-०२-२०२५ रोजी "आज पावतो काहिच न कळविल्यामुळे"** असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर **प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.-२, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ** यांनी सुनावणी घेवून निर्णय पारीत केल्याचे दिसून येत नाही.

सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००७/११८२/प्र.क्र.६५/०७/६(मा.अ.) दि.१२.१२.२००७, शासन परिपत्रक क्र.केमाअ-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/६(मा.अ.)दि.३१.०३.२००८, शासन परिपत्रक क्र.संकिर्ण २०१४ प्र.क्र.२४०/२०१४/सहा/दि.१३.०२.२०१५ अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिल अर्जावर सुनावणी घेवून आदेश निर्गमित करणे बंधनकारक आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी हे संबंधित प्राधिकरणातील एक जेष्ठ अधिकारी असतात. त्यांच्या कार्यालयातील कामकाजाची त्यांना संपूर्ण माहिती असते. यामुळे अपिलार्थी यांच्या माहितीसाठीच्या अर्जावर माहिती पुरविण्यात काही समस्या असतील तर त्यावर सुनावणीच्या वेळी ते तोडगा काढू शकतात व अपिलार्थीस सत्वर माहिती पुरविण्यास मदत होऊ शकते. या भुमिकेतून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणामध्ये प्रथम अपिलीय अधिकारी घोषित करण्यात आले आहेत व अधिनियमातील कलम १९(१) अन्वये दाखल करण्यात आलेल्या प्रथम अपील अर्जावर संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून निर्णय पारीत करणे आवश्यक आहे. तद्नंतर या प्रथम अपीलाच्या निर्णयावर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे अभिप्रेत आहे.

अत: प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक **०४-१०-२०२४** रोजीच्या प्रथम अपिलवर प्रथमत: सुनावणी घेऊन निर्णय पारित करणे आवश्यक आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(८)(a) व १९(७) अन्वये आयोगास प्राप्त अधिकारान्वये **प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्र.-२, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ** यांना कळविण्यात येते की, अपिलार्थी

यांनी दाखल केलेल्या **दि.०४-१०-२०२४** रोजीच्या प्रथम अपिल अर्जावर सदर आदेश प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत सुनावणी घेवून समन्यायीक निर्णय पारित करण्यात यावा. याकरीता अपिलार्थीस लेखी सुचना देवून सुनावणी आयोजित करावी. सुनावणीची लेखी सुचना संबंधितांना बजावून दोन्ही पक्षाची बाजू ऐकुन स्वयंस्पष्ट आदेश पारीत करावेत.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी जर प्रथम अपिल आदेशाद्वारे माहिती देण्याचा निर्णय घेतला तर त्या निर्णयानुसार अपिलार्थींना माहिती विहित करण्यात आलेल्या वेळेत प्राप्त होईल याची प्रथम अपिलीय अधिकारी यांनी खात्री करावी.

अपिलार्थी यांना प्रथम अपिलावरील निर्णय मान्य न झाल्यास/ अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग अमरावती कार्यालयाकडे व्दितीय अपिल करण्याची मुभा राहिल. व्दितीय अपिल दाखल करतांना सदर आदेशाचा संदर्भ नमुद करणे आवश्यक राहिल.

तसेच कळविण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालया मधील मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, दिनांक १७, ऑगस्ट २०२३ चे आदेश तसेच सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. रामाआ २०१९/प्र.क्र.१८/सहा, दिनांक १६.०२.२०२३ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ च्या अंमलबजावणीत सूचित करण्यात आले आहे त्यानुसार प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयातील स्वयंम प्रेरणेने घोषित करावयाची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ४ अनुसार १७ मुदयांची माहिती वेळोवेळी (दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै) अद्ययावत करण्यात यावी तसेच कलम ४ व्यतीरीक्त आपल्या कार्यालयातील स्वयंप्रेरणेने प्रदर्शीत करणे आवश्यक असलेली सर्व माहिती आपल्या अधिकृत संगणक संकेतस्थळावर वेळोवेळी प्रदर्शित करण्यात यावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगास सादर करण्यात यावा.

**आदेश**

उपरोक्त आदेशासह सदर व्दितीय अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(रविंद्र ठाकरे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती.**
**दिनांक : १८/११/२०२५**

जावक क्रमांक ---------- दिनांक 1-9-DEC-2025

19 DEC 2025